नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक


# आशा भोसले यांचे निधन

## काल प्रकृती बिघडल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, आज ४ वाजता अंत्यसंस्कार



(स. गांवकरी)

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले आहे. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात रविवारी दुपारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना शनिवारी संध्याकाळी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ब्रीच कँडी रुग्णालयाचे डॉ. प्रतीक समदानी यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, आशा भोसले यांना अनेक वैद्यकीय समस्या होत्या आणि मल्टी-ऑर्गन फेल्युअरमुळे त्यांचे निधन झाले. डॉ. प्रतीक समदानी यांनी पीटीआयला सांगितले की, आशा भोसले यांना मल्टी-ऑर्गन फेल्युअरचा त्रास होता, म्हणजेच त्यांचे अनेक अवयव निकामी झाले होते. आशा भोसले यांचे पुत्र, आनंद भोसले यांनी सांगितले की, ज्यांना अंत्यदर्शन घ्यायचे आहे ते उद्या सकाळी ११ वाजता त्यांच्या घरी येऊ शकतात. उद्या दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क येथे अंत्यविधी होणार आहे. आशा भोसले यांचे पुत्र, आनंद भोसले म्हणाले, "उद्या सकाळी १०:३० ते दुपारी २ वाजेपर्यंत कासा ग्रांडे इमारतीत लोकांना माझ्या आईचे अंतिम दर्शन घेता येईल. दुपारी ४ वाजता स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने लोकांनी तिथे गर्दी करू नये, अशी मी विनंती करतो." आशा भोसले यांच्या निधनाबद्दल आदरांजली वाहण्यासाठी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर दोन मिनिटांचे मौन पाळण्यात आले. मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर यांच्यातील आयपीएल २०२६ च्या मोठ्या सामन्यापूर्वी ही आदरांजली वाहण्यात आली. सामन्यादरम्यान, दोन्ही संघांतील खेळाडूंनी केवळ मौन पाळले नाही, तर त्या महान गायिकेच्या स्मरणार्थ हातावर काळ्या पट्ट्याही बांधल्या. मैदानावर आशा भोसले यांची गाणीही वाजवण्यात आली.




## थोडक्यात...



### सोलापूरच्या तापमानात पुन्हा वाढ

पंढरपूर (स. गांवकरी) : सोलापूर शहराच्या तापमानात पुन्हा वाढ झाली आहे. सोलापूरचा पारा ४१.६ अंश सेल्सियस इतके नोंद झाले आहे. त्यामुळे उन्हाचे चटके आता खऱ्या अर्थाने सोसावे लागणार आहेत. ११ एप्रिलच्या तुलनेत १२ एप्रिल रोजी तापमानात तब्बल ०.२ अंशांची लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली आहे. यामुळे शहरात दुपारच्या वेळी शहरात जणू 'अघोषित संचारबंदी'असल्यासारखा शुकशुकाट पाहायला मिळत आहे. सोलापूर शहरात तापमानात वाढ होत आहे. दिवसेंदिवस उन्हाचा चटका अधिकच तीव्र होत आहे. कमाल तापमान ४१.६ अं. सेल्सियस तर किमान तापमान २६.६ अंश सेल्सियस नोंद झाली आहे. कोरडे हवामान आणि कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. हवेतील आर्द्रता घटल्याने उन्हाचा चटका अधिक तीव्र जाणवत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, एप्रिलचा मध्य जवळ येत असताना सूर्याची प्रखरता आणखी वाढणार आहे. १० मार्च रोजी तापमानात मोठी वाढ झाल्यानंतर मध्यंतरी काही दिवस किंचित दिलासा मिळाला होता. मात्र, रविवारचे तापमान ४१.६ अंशांच्या नोंदीने पुन्हा एकदा उन्हाचा त्रास वाढला आहे.

### अकोला येथे पारा ४३.१ अंशावर

मुंबई (स. गांवकरी) : राज्यात सध्या कोरडे हवामान असून काही ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरणाची नोंद होत आहे. मागील काही दिवसांच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात वाढ झाली असून यामुळे तीव्र उन्हाचा तडाखा नागरिकांना सहन करावा लागत आहेत. उत्तर मध्य महाराष्ट्रातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली असून विदर्भ आणि मराठवाड्यातही उन्हाची काहिली वाढली आहे. वायव्य भारतावर समुद्रसपाटीपासून १२.२ किलोमीटर वर उष्णतेचा पट्टा तयार झाला आहे. तसेच १५ एप्रिल रोजी हिमालय प्रदेशात पुन्हा तीव्र पश्चिमी विक्षोभाची स्थिती निर्माण होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात सध्या अनेक भागातील कमाल तापमानात वाढ झाली असून यामुळे उन्हाळा अधिक तीव्र होत आहे. मागील काही दिवस पावसाळी हवामान असल्याने कमाल तापमानात आणि किमान तापमानातही काहीशी घट झाली होती यामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला होता.

### 'त्या' कर्मचाऱ्यांबाबत घेतला मोठा निर्णय

पुणे (स. गांवकरी) : माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीच्या नाशिकमधील कार्यालयातील अनेक धक्कादायक गोष्टी समोर येत आहेत. असे असताना माहिती तंत्रज्ञान कंपनीने या प्रकरणी खुलासा करीत संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई केल्याचे जाहीर केले आहे. या प्रकरणाच्या चौकशीत तपास यंत्रणांना सर्वतोपरी सहकार्य केले जात असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले आहे. माहिती तंत्रज्ञान कंपनीने म्हटले आहे की, अत्याचार आणि इतर गैरप्रकाराचे प्रकरण कंपनी थारा देत नाही. आम्ही कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि कल्याणाला नेहमीच प्राधान्य देतो. यासाठीची उच्च मानके आम्ही स्वीकारलेली असून, त्यांचे पालन केले जाते. कर्मचाऱ्यांच्या छळाच्या घटनांना व्यवस्थापन सहन करणार नाही. नाशिकमधील प्रकरणात चौकशी सुरू असलेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिकमधील प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर आम्ही तातडीने ही कारवाई केली आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडून सहाय्य मिळविणे अधिक सुलभ

## नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे ८ तासांत मिळणार रुग्णांना आर्थिक मदत

मुंबई : (स. गांवकरी)

नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडून गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान होणार आहे. यात रूग्णाऐवजी परस्पर रूग्णालयाकडून आर्थिक सहाय्यासाठी अर्ज सादर होणार असल्याने रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची होणारी परवड थांबणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची ऑनलाईन प्रणाली अद्ययावत करण्यात येत आहे. यामुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया आठ तासांत पूर्ण होईल. विशेष म्हणजे रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळेल. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाकडून देण्यात आली. वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये रुग्णकेंद्री बदल करण्याचे काम सुरु आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवेल. नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन आठ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळेल. रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहेत. राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येईल, असे या कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी 1800 123 2211 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एप्रिल,२०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला. या रूग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली.

# शिक्षकांचा २१ एप्रिलपासून बेमुदत संपाचा इशारा

**२० सप्टेंबरच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी रखडल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटनांच्या समन्वय समितीने २१ एप्रिलपासून बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. जनजागृतीसाठी तालुकानिहाय दौरे सुरु करण्यात आले आहेत. हा संप यशस्वी करण्याचे आवाहन समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केले आहे. समन्वय समितीच्या म्हणण्यानुसार, राज्य शासनाने पूर्वीच्या आंदोलनांनंतर जुन्या पेन्शनसदृश आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्याचे धोरण तत्त्वतः मान्य केले होते तसेच यासंदर्भात समिती स्थापन करून शिफारशीही स्वीकारल्या. दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा शासन निर्णय झाला असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. परिणामी, १ मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत नसल्याने मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. राज्यात सध्या एनपीएस, आरएनपीएस व केंद्राची यूपीएस योजना या पर्यायांचा विचार सुरू आहे. मात्र, एनपीएस योजना कर्मचाऱ्यांसाठी अपुरी असल्याचे मत, केंद्रातील यूपीएस योजना अनेक कर्मचाऱ्यांनी नाकारल्याचा उल्लेख, आरएनपीएस योजना अधिक सुरक्षित व फायदेशीर असल्याचा दावा समितीने केला आहे. त्यामुळे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तात्काळ लागू करावी यासह प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी संप केला जाणार असल्याचे समितीकडून सांगण्यात आले.


# अमेरिका-इराण युद्ध पुन्हा भडकणार?

## डोनाल्ड ट्रम्प यांची मोठी घोषणा, होर्मुझ सामुद्रधुनीच्या नाकेबंदीचे दिले आदेश

(स. गांवकरी)

अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्धविराम झाल्यानंतर पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये शांतता चर्चा पार पडली. या चर्चेत अमेरिका-इस्रायल आणि इराणचं शिष्टमंडळ सहभागी झालं होतं. मात्र, या बैठकीत ठोस कोणताही तोडगा निघाला नाही. २१ तास चाललेली ही चर्चा निष्फळ ठरली. ही चर्चा निष्फळ ठरल्यानंतर आता अमेरिका-इराण युद्ध पुन्हा भडकण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

याचं कारण म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता इराणला पुन्हा एकदा मोठा इशारा देत थेट होर्मुझ सामुद्रधुनीच्या नाकेबंदीचे आदेश दिले आहेत. 'अमेरिका कोणत्याही जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये प्रवेश करू देणार नाही किंवा बाहेरही पडू देणार नाही', असं



वक्तव्य ट्रम्प यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये पुन्हा एकदा तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ट्रम्प यांनी रविवारी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं की, "होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी तात्काळ लागू होईल. मी जगातील सर्वोत्तम असलेल्या अमेरिकेच्या नौदलाला, आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात इराणला कोणतंही शुल्क दिलेल्या कोणत्याही जहाजाचा शोध घेऊन त्याला अडवण्याचे निर्देश दिले आहेत. अशा जहाजांना खुल्या समुद्रातून सुरक्षित मार्ग दिला जाणार नाही. तात्काळ प्रभावाने ही प्रक्रिया सुरू केली जाईल", असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

"इराणने जलमार्ग खुला ठेवण्याच्या आश्वासनांचं पालन केलेलं नाही आणि सुरुंगांच्या धमक्यांमुळे जहाजांच्या हालचाली आधीच थांबलेल्या आहेत. कारण तिथे कुठेतरी सुरुंग असू शकतात. त्यामुळे कोणता जहाज मालक अशा प्रकारचा धोका पत्करू इच्छितो?", असा सवालही ट्रम्प यांनी केला.

अमेरिका-इराण युद्धाच्या शांतता चर्चेबाबत बोलताना ट्रम्प यांनी म्हटलं की, "इस्लामाबादमध्ये इराणी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या जवळपास २० तास चाललेल्या प्रदीर्घ चर्चेत अनेक मुद्द्यांवर एकमत झालं. मात्र, इराणच्या अणुकार्यक्रमाच्या एकमेव महत्त्वाच्या मुद्द्यावर तो करार अयशस्वी ठरला. बाकी बैठक चांगली झाली, बहुतेक मुद्द्यांवर एकमत झालं. पण जो एकमेव महत्त्वाचा मुद्दा होता, तो म्हणजे अणुऊर्जा. इराण आपल्या अणुऊर्जाविषयक महत्त्वाकांक्षेवर अढळ आहे", असं ट्रम्प यांनी स्पष्ट केलं. "होर्मुझ सामुद्रधुनीमधून जाणाऱ्या जहाजांकडून कोणतंही शुल्क घेणं ही जागतिक खंडणी आहे. अमेरिका इराणला या बेकायदेशीर कृत्यातून नफा मिळवू देणार नाही. इराणला टोल देत असल्याचा संशय असलेल्या जहाजांना अमेरिकी नौदल सक्रियपणे रोखेल. तसेच जो कोणी इराणला बेकायदेशीर टोल देईल त्याला खुल्या समुद्रात सुरक्षित मार्ग मिळणार नाही", असा इशाराच डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

# शिंदेंकडून ऑपरेशन टायगरच्या चर्चांना पूर्णविराम

## मी एकदाच ऑपरेशन केले, आता साध्या गोळीवर लोक माझ्याकडे येतील

पंढरपूर : (स. गांवकरी)

"मला आता कोणत्याही 'ऑपरेशन'ची गरज नाही. जे एकदा करायचे होते, ते मी करून दाखवले आहे आणि ते लोकांच्या चांगलेच लक्षात आहे. आता तर साध्या गोळीवरही लोक माझ्याकडे येतील," अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना पूर्णविराम दिला. पंढरपूर येथे आयोजित एका भव्य सोहळ्यात भगिरथ भालके आणि अनिल सावंत यांच्या पक्षप्रवेशानंतर उपमुख्यमंत्री बोलत होते. यावेळी त्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात 'ऑपरेशन टायगर' राबवून विरोधकांना खिंडार पाडले जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. यावर भाष्य करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "आपला अजेंडा जनसेवेचा आहे. कामाचा धडाका पाहून लोक स्वतःहून सोबत येत आहेत. त्यामुळे आता कुठल्या ऑपरेशनची गरज उरलेली नाही. सोलापूरच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेले दिवंगत नेते भारत भालके यांचे सुपुत्र



भगिरथ भालके आणि अनिल सावंत यांनी समर्थकांसह शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला. या प्रवेशामुळे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भालके यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असल्याचे सांगत उपमुख्यमंत्र्यांनी या मतदारसंघावर दावा अधिक भक्कम केला आहे. काही दिवसांपूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विरोधकांना उद्देशून "निधीसाठी आमच्याकडेच यावे लागेल," असे विधान केले होते. त्यावर एकनाथ शिंदेंनी कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले. "पैसे हे जनतेचे असतात आणि ते जनतेसाठीच खर्च झाले पाहिजेत. कोणाच्या वैयक्तिक खिशातले ते पैसे नाहीत. त्यामुळे कुणी कुणाला वाकवण्याची भाषा करू नये," असा टोला शिंदेंनी लगावला. यावेळी त्यांनी शेरोशायरी आणि अभंगांचा आधार घेत आपल्या भाषणात जोरदार फटकेबाजी केली. शिवसेनेत प्रवेश करताच भगिरथ भालके यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना थेट आव्हान दिले. "निधी देणारा माणूस आज इथे समोरच स्टेजवर बसला आहे, येऊन बघा," अशा शब्दांत भालकेंनी जयकुमार गोरेंवर प्रहार केला. या पवित्र्यामुळे पंढरपुरात महायुतीमधील भाजप आणि शिवसेना यांच्यातील संघर्ष येत्या काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# दत्त देवस्थानमध्ये आशा भोसले यांची दोनवेळा गायनसेवा


अहिल्यानगर : (स. गांवकरी)

आपल्या वैविध्यपूर्ण गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आशा भोसले यांनी शहरातील दत्त देवस्थानमध्ये (वेदांतनगर) दोनवेळा गायनसेवा रुजू केली होती. त्यांच्या या गायनाच्या स्मृती आजही भक्तगण व देवस्थानच्या सेवेकाऱ्यांमध्ये ताज्या आहेत. गायनसेवेच्या वेळी आशा भोसले यांचा गुरुदेव रामकृष्ण महाराज यांनी त्यांचा साडीचोळी देऊन गौरव केला होता. आशा भोसले, लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर व मंगेशकर कुटुंबातील इतर सदस्य चारवेळा देवस्थानमध्ये दर्शनाला आले होते. याशिवाय क्षीरसागर महाराज मुंबईत उपचारासाठी दाखल असतानाही त्यांची आशा भोसले यांनी रुग्णालयात भेट घेतली होती. शहरातील प्रसिद्ध दत्त देवस्थान येथे २२ नोव्हेंबर १९९३ मध्ये रामकृष्ण क्षीरसागर महाराज यांच्या षठ्यब्दी पुर्तीनिमित्त रौप्यतुला कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी भक्तांच्या वतीने देवस्थानच्या आवारात 'अमृताचा घनु' हा आशा भोसले यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संगीतकार हृदयनाथ मंगेशकर व साहित्यिक, व्याख्याते राम शेवाळकर यांनी निरुपण केले होते. हा कार्यक्रम



सुमारे साडेचार तास रंगला. ज्ञानेश्वरांचे अभंग गात त्यांनी उपस्थितांना मंत्रमुक्त केले होते. यावेळी देवस्थानच्या वतीने आशा भोसले यांचा सन्मानही करण्यात आला. गुरुदेवांच्या ज्येष्ठ भक्त मंदा जोशी यांच्याकडे या संदर्भातील माहिती उपलब्ध आहे. देवस्थानचे विश्वस्त ॲड. मिलिंद क्षीरसागर यांनीही या कार्यक्रमाच्या आठवणींना उजाळा देताना कार्यक्रम साडेचार तास रंगला होता असे सांगितले. त्यापूर्वीही आशा भोसले लता मंगेशकर देवस्थानमध्ये दर्शनासाठी आलेल्या होत्या. आशा भोसले यांचा त्यानंतरही १९९५ मध्ये गायनसेवेचा कार्यक्रम देवस्थानच्या आवारातील मैदानावर झाल्याची आठवण देवस्थानचे सेवेकरी रावसाहेब थोरवे यांनी सांगितली. 'अमृताचा घनु' या कार्यक्रमापूर्वी तीन वर्ष आधी आशा भोसले, लता मंगेशकर देवस्थानमध्ये दर्शनासाठी आल्या होत्या. त्यावेळी क्षीरसागर महाराजांनी त्यांना प्रसादभोजन घेण्यास सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### बिनविरोध निवडीतून विशाल राठोड यांना मतदानाचा अधिकार

हिमायतनगर (स. गांवकरी) : तालुक्यातील मौजे जिरोना येथील सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळांची बैठक आज दि 11 एप्रिल रोजी पार पडली या बैठकीत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक 2026 साठी मतदानाचा अधिकार देण्याबाबत सर्वांनि एकमताचा निर्णय घेऊन कुठलाही विरोध न करता एक दिलाने वडगाव नगरीचे माजी सरपंच विशाल राठोड यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या निर्णयानुसार विशाल राठोड यांना यावर्षी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार मिळणार असून त्या निवडणुकीसाठी अधिकृत प्रतिनिधी म्हणून मतदानाचा अधिकार त्यांना देण्यात आला आले यावेळी वामन पाटील, बालाजी कदम, चेअरमन कैलान राठोड, रामदास भडंगे, बळवंत जाधव, पांडुरंग वानखेडे, सुरेश वानखेडे, श्रीराम बिरकुरे, छत्रपती भिसे, विनोद राठोड यांच्या सह जिरोना येथील नागरिक व असंख्य गावकरी मंडळीनि विशाल राठोड यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



### स्वारातीम विद्यापीठात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र येथे आज शनिवार, दि.११ एप्रिल, २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनीता पाटील, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, सहा.कुलसचिव अनिरुद्ध राहेगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अधीक्षक के. डी. पाटील, सिस्टीम एक्स्पर्ट शिवलिंग पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



### महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त भव्य प्रभात फेरी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड दि. ११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त सकाळी ७.३० ते ९ या वेळेत सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नांदेड यांच्या वतीने स्व. वसंतराव नाईक चौक ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीत शासकीय मुलांचे व मुलींचे वसतिगृह तसेच महाविद्यालयीन सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रभात फेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून तसेच शैक्षणिक संदेशपर कविता सादर करून सामाजिक जागृतीचा प्रभावी संदेश दिला. यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले प्रमुख उपस्थित होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व मान्यवरांना द्विशताब्दी वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या तसेच समग्र वाङ्मय ग्रंथ भेट म्हणून प्रदान केले. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नांदेड येथील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी नांदेड जिल्ह्याचे सहाय्यक संचालक सचिन खुणे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### जनगणनेची अचूक माहिती देऊन सहकार्य करा - जिल्हाधिकारी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जनगणना फील्ड ट्रेनर्सच्या तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, भारताची जनगणना ही देशातील १६ वी जनगणना असून स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना आहे. ही जनगणना पूर्णपणे डिजिटल स्वरूपात होणारी पहिलीच जनगणना असून ती अधिक अचूक, वेगवान आणि पर्यावरणपूरक असेल. यामध्ये प्रथमच सामान्य नागरिकांना पोर्टलद्वारे स्वगणनेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जनगणना ही भारतीय संविधानात नमूद केलेली अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून लोकशाहीचा पाया अधिक भक्कम करण्यासाठी तिची भूमिका महत्त्वाची आहे. जनगणनेद्वारे गोळा होणारी माहिती ही राष्ट्रनिर्मितीचा आधार असून यावरच विकास योजना, धोरणनिर्मिती, कल्याणकारी योजना आणि पायाभूत सुविधांचे नियोजन ठरवले जाते. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी मे आणि जून २०२६ या कालावधीत आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना अचूक माहिती देऊन राष्ट्रनिर्मितीत सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात करण्यात आले आहे.

# मंगळवेढ्यात वैदू जातपंचायतीचा मनमानी कारभार

## आंतरजातीय विवाह प्रकरणी कुटुंबाला दंड व सामाजिक बहिष्काराचा प्रयत्न!

- वैदू जात पंचायतीत पंचांच्या आडमुठ्यापणामुळे समाजामध्ये भीती!
- समाजाला वाळीत टाकून पैसे उकळण्याचे काम!
- जात पंचायत बंद नाही जात पंचायत च्या अडून जादा पैसे कमावने हात धंदा!



मंगळवेढा : (स. गांवकरी)

महाराष्ट्रात सामाजिक बहिष्कार व जातपंचायतींवर बंदी घालणारा कायदा अस्तित्वात असतानाही मंगळवेढा तालुक्यातील वैदू वस्ती येथे जातपंचायतीचा मनमानी कारभार उघडकीस आला आहे. आंतरजातीय विवाह केलेल्या एका तरुणीच्या कुटुंबीयांवर जातपंचायतीकडून दंड ठोठावणे, अपमानास्पद वागणूक देणे आणि सामाजिक बहिष्कार टाकण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणीने आंतरजातीय विवाह केल्यामुळे तिच्या चुलत काकाच्या साखरपुड्याच्या पार्श्वभूमीवर ७ एप्रिल २०२६ रोजी वैदू वस्ती येथे जातपंचायत भरवण्यात आली. या बैठकीत लक्ष्मण गुडील, राघू गुडील, अशोक गुडील आणि धनु वरगंटी या पंचांच्या नेतृत्वाखाली कुटुंबावर कारवाई करण्यात आली.

या जातपंचायतीत संबंधित कुटुंबावर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. तसेच, कुटुंबीयांना "महार, भंगी" अशा जातीवाचक शिव्या देत सार्वजनिकरीत्या अपमानित करण्यात आले. याचबरोबर, आंतरजातीय विवाह केलेल्या मुलीला भविष्यात कोणत्याही सामाजिक किंवा धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यास मज्जाव करण्यात आला. कुटुंबीयांना तिच्याशी संबंध तोडण्यास (सुतक तोडण्यास) भाग पाडण्यात आले असल्याचेही समोर आले आहे. या प्रकारामुळे सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायद्याचा सरळसरळ भंग झाल्याचे स्पष्ट होत आहे. महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या या कायद्याचा उद्देशच जातपंचायतींच्या बेकायदेशीर निर्णयांना आळा घालणे आणि नागरिकांच्या संविधानिक अधिकारांचे संरक्षण करणे हा आहे. मात्र, प्रत्यक्षात अजूनही काही ठिकाणी जातपंचायतींचा दबाव कायम असल्याचे या घटनेतून दिसून येते. तसेच, जातीवाचक शिवीगाळ केल्यामुळे अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत हा गंभीर गुन्हा ठरू शकतो. त्यामुळे संबंधित पंचांवर कठोर कारवाई होण्याची मागणी जोर धरत आहे. या घटनेचा निषेध करत पुरोगामी कार्यकर्त्या दुर्गा गुडीलू व लक्ष्मण शिर्के यांनी महाराष्ट्रातील सर्व पुरोगामी संघटना व कार्यकर्त्यांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. "जातपंचायतींचा बेकायदेशीर हस्तक्षेप रोखण्यासाठी आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी आवाज उठवणे गरजेचे आहे," असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, या घटनेमुळे मंगळवेढा परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, तसेच पीडित कुटुंबाला संरक्षण द्यावे, अशी मागणी होत आहे. सामाजिक न्याय व संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी अशा घटनांवर कठोर पावले उचलण्याची गरज अधोरेखित होत आहे.

## नांदेड जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड दि.११ एप्रिल रोजी नांदेड जिल्ह्यातील नांदेड शहर व ग्रामीण भाग, अर्धापूर, हदगाव, हिमायतनगर या तालुक्यातील काही गावांमध्ये आज दि ११ एप्रिल रोजी सकाळी ८:४५ मी वाजता भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली होती. त्यानुसार राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता दि ११ एप्रिल रोजी सकाळी ८. ४५ वाजता या धक्क्याची नोंद झाली असून या धक्क्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ४. ७ एवढी नोंदविण्यात आली असून, याचा केंद्रबिंदु हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरली गावाच्या उत्तरेला असल्याचे कळते. सदर धक्का हा सौम्य प्रकारचा आहे . तसेच या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याबाबत संबंधित तहसीलदार यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे. याबाबत नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. याबाबत प्रशासनाशी आपण संपर्कात असून नागरिकांनी सतर्क राहावे,घाबरुन जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. तर नागरिकांनी सतर्क राहावे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. तरी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. तसेच गावात ज्या लोकांच्या घराचे छत पत्र्याचे आहे व त्यांनी पत्र्यावर आधारासाठी दगड ठेवले आहेत त्यांनी सुरक्षिततेचा भाग म्हणून त्वरित दगड काढून घ्यावेत व पत्रे बोल्ट ने फिट करून घ्यावीत. पुन्हा असा आवाज आलाच तर पटकन घराबाहेर मोकळ्या जागेत गोळा व्हावे व प्रशासनाला (02462) 235077 या क्रमांकावर संपर्क करून कळवावे.

## ग्रामसेवकांचा सरपंचाला डच्चू देत मनमानी कारभार

### अतिक्रमनाच्या मुद्याने सरसम पेटले ; ठराविक नागरिकांनाच नोटीस

हिमायतनगर : (स. गांवकरी)

तालुक्यातील मौजे सरसम बु. ग्रामपंचायत चे ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक ) यांनी आपल्या मर्जीनेच काही लोकांच्या भुलथापांना बळी पडत मनमानी कारभार चालवला आहे.गावातील अतिक्रमनाचा मुद्दा आता वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे.ग्रामसेवक डुडुळे यांनी अतिक्रमण करणाऱ्यांना सोडून वाचवणाऱ्यांना नोटीस पाठवून दाखवून दिले आहे की त्यांचा मनमानी कारभार कसा चालतो. अतिक्रमण काढण्याचीसाठी सरपंच यांना न विचारता थेट निर्णय घेत त्यांनी नोटीस पाठवली आहे.यामुळे सरसम गावात अतिक्रमनाचा मुद्दा पेटलेला पाहायला मिळतं आहे.



काही दिवसापूर्वी गावातील काही नागरिकांनी ग्रामपंचायतच्या मालकीची शासकीय जागेत अतिक्रमण करत जेसीबी ने जागा बनवून हबाळण्याचा प्रयत्न केला होता. पण याकडे ग्रामपंचायत अथवा ग्रामसेवक यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. उलट ती जागा अतिक्रमण पासून वाचवणाऱ्याला मात्र नोटीस पाठवून त्रास दिला जात आहे. हे कोणाच्या सांगण्यावरून करत आहेत कां? असा प्रश्न आता निर्माण होत आहे.उलट अतिक्रमण करणाऱ्यांना खुलेआम सोडले जात आहे.सरसम मध्ये अतिक्रमनाचा मुद्दा पेटलेला असताना ग्रामसेवक यांनी केवळ ठराविक नागरिकांनाच नोटीस पाठवून त्रास दिल्याचे दिसून आले आहे. पण प्रत्यक्षात गावात अनेक ठिकाणी रस्त्यात, ग्रामपंचायतच्या मालकी जागेवर विळखा घालून बसलेले त्यांच्या नजरेत काय ऐकण्यात सुद्धा नाही कां? जशी ही नोटीस पाठवून ते त्यांचे कार्य करत आहेत असा ठपका ठेवत आहेत. त्याचप्रमाणे गावात असलेले रस्त्यावरील व इतर जागेवरील असलेले अतिक्रमण ते तितक्यात तत्परतेने काढण्यासाठी पुढाकार घेतील कां ? की काही लोकांच्या भुलथापांनाच बळी पडतील? हे कळणे कठीण आहे. या बाबीकडे गटविकास अधिकारी लक्ष देतील कां? की फक्त काही ठराविक नागरिकांनाच नोटीस पाठवून त्रास द्यायचे हे ग्रामसेवक यांनी ठरवले ?अश्या एक नाही अनेक प्रश्नांना आता तोंड फुटत आहे.

## महाड सत्याग्रह शताब्दी व जयंती महोत्सव उत्साहात

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सप्ताहानिमित्ताने महाड सत्याग्रह शताब्दी आणि महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव उत्साहात पार पडत आहे. आज शनिवार दि.११ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर हे होते. मुख्यवक्ते तेलंगाना न्यूज टीव्हीचे कार्यकारी संचालक तथा वरिष्ठ पत्रकार पाशम यादगिरी हे होते. विशेष उपस्थितीमध्ये प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, हैद्राबाद येथील कस्टमचे माजी अधीक्षक महेश्वर राज, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, समन्वयक डॉ. सुनीता पाटील यांची उपस्थिती होती.

दुसऱ्या सत्रामध्ये मुंबई येथील शाहीर चरण जाधव यांनी आंबेडकरी शाहिरी जलसा सादर केला.

रविवार दि.१२ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठ परिसरातील व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये "महाड सत्याग्रह शताब्दी वर्षे/समतेचा संघर्ष" या विषयावर चित्रकला स्पर्धा, "महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील समता, स्वतंत्र व संविधान" या विषयावर रांगोळी स्पर्धा तर "महाड सत्यागृह महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार" या विषयावर वकृत्त्व स्पर्धा पार पडणार आहे. तर सोमवार दि.१३ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठातील ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये १८ तास अभ्यासाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत विद्यार्थी व कर्मचारी अभ्यास करणार आहेत. मंगळवार, दि.१४ एप्रिल, २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून दि.१५ एप्रिल, २०२६ रोजी समारोप व पारितोषिक वितरण समारंभ पार पडणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे यांची उपस्थिती लाभणार आहे, असे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनीता पाटील यांनी कळविले आहे.

जयंती महोत्सव व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, डॉ. राजेंद्र गोणारकर, काळबा हनवते, संदीप एडके, हर्षवर्धन दवणे यांच्यासह प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्साहात साजरी

नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह-२०२६ अंतर्गत दि ११ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता नांदेड येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहूल कर्डीले व सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी समाज कल्याण विभागातील अधिकारी, कर्मचारी, तालुका समन्वयक व समतादूत मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंतीनिमित्त उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना शुभेच्छा देत जिल्हाधिकारी राहूल कर्डीले व सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या महान कार्याची माहिती दिली. त्यानंतर समाज कल्याण कार्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भिमराव हाटकर (सामाजिक कार्यकर्ते), राज गोडबोले (सामाजिक कार्यकर्ते), संभाजी कांबळे (दै. सम्राट प्रतिनिधी) व गजानन नरवाडे (समाज कल्याण अधिकारी) उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर मुख्य वक्ते डॉ. भिमराव हाटकर यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सामूहिक संविधान वाचन करण्यात आले.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आता प्रख्यात कॅन्सर तज्ज्ञ डॉ. संदीप इशी यांची सेवा




नंदी हिल्स : (स. गांवकरी)

मुंबईतील प्रख्यात टाटा मेमोरियल हॉस्पिटलचा अनुभव असलेले आणि उत्तर महाराष्ट्रातील ज्येष्ठ आणि प्रख्यात मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट (कॅन्सर तज्ज्ञ) डॉ. संदीप इशी आता एसएमबीटी (SMBT) हॉस्पिटल व कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे पूर्णवेळ सेवा देण्यासाठी रुजू झाले आहेत. त्यांच्या निवडीमुळे नाशिक, अहमदनगर, छ. संभाजीनगर, जालना, ठाणे, पालघरसह खान्देशातील रुग्णांना आता जागतिक दर्जाचे उपचार आपल्या जवळच उपलब्ध झाले आहेत. जास्तीत जास्त रुग्णांनी हॉस्पिटलच्या विशेष योजनांचा लाभ घेऊन तज्ञ डॉक्टरांकडून उपचार करून घ्यावेत असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाकडून करण्यात आले आहे. डॉ. संदीप इशी यांनी मुंबईच्या टि. एन. मेडिकल कॉलेजमधून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर बेंगळुरू येथून डी.एन.बी. आणि त्यानंतर टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथून 'मेडिकल ऑन्कोलॉजी'मध्ये डी.एम. ही सर्वोच्च पदवी संपादन केली आहे. कॅन्सर उपचाराचा त्यांना १४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे., गेल्या ७ वर्षांपासून त्यांनी नाशिकमध्ये हजारो रुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत. टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि निमहन्स (NIMHANS) सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये त्यांनी वरिष्ठ निवासी म्हणून काम केले असल्याने जटिल प्रकरणांमध्ये त्यांनी विशेष नैपुण्य मिळवले आहे. कर्करोगाच्या उपचारात केवळ शस्त्रक्रिया महत्त्वाची नसते, तर त्यानंतर दिली जाणारी औषधोपचार पद्धती रुग्णाचे आयुष्य वाढवण्यासाठी मोलाची ठरते. डॉ. इशी हे सिस्टेमिक केमोथेरपी, इम्युनोथेरपी, केमो-रेडिओथेरपी, मॉलिक्युलर टार्गेटेड थेरपी आणि हार्मोनल थेरपी यांसारख्या प्रगत उपचार पद्धतींमध्ये तज्ज्ञ मानले जातात. विशेषतः रक्ताचा कॅन्सर (Lymphoma / Leukemia), स्तनाचा कॅन्सर आणि फुफ्फुसांच्या कर्करोगावर उपचार करण्यासाठी त्यांची ओळख आहे. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. इशी यांची सेवा उपलब्ध झाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना मोठा फायदा होणार आहे. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना योजनेअंतर्गत सर्व रेशनकार्ड धारकांसाठी येथे मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. संदीप इशी यांची ओपीडी सेवा सोमवार ते शनिवार, सकाळी ९.०० ते दुपारी ४.३० या वेळेत उपलब्ध असेल.

### आजार अंगावर काढू नका

कर्करोगाचे लवकर निदान झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर आम्ही ग्रामीण भागातील शेवटच्या रुग्णापर्यंत पोहोचण्याचे ध्येय ठेवले आहे. कर्करोगाशी निगडीत बहुतांश शस्त्रक्रिया या आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत मोफत होत आहेत. त्यामुळे रुग्णांनी आजार अंगावर न काढता रुग्णालयात भेट द्यावी किंवा जवळच्या एसएमबीटी क्लिनिकमध्ये संपर्क साधावा.

**- डॉ. संदीप इशी**
**मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट (कॅन्सर तज्ज्ञ)**
**एसएमबीटी हॉस्पिटल**

# थोडक्यात पण महत्वाचे



## पिठेवाडी येथील बंधाऱ्याची दुरुस्ती दर्जेदार व्हावी - किरण पाटील

इंदापूर (स. गांवकरी) : पिठेवाडी ,चाकाटी, चाकोरे नीर निमगाव या परिसरातील पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीच्या पाण्यासाठी अत्यंत उपयुक्त असलेला पिठेवाडी येथे बंधाऱ्याचे दुरुस्ती काम सुरू असून हे काम दर्जेदार पद्धतीने झाले पाहिजे यासाठी कामाची पाहणी करून संबंधित ठेकेदाराला काम दर्जेदार करण्यासंबंधीच्या सूचना पंचायत समिती सदस्या धनश्री पाटील यांचे प्रतिनिधी म्हणून किरण पाटील तसेच पिठेवाडी गावचे सरपंच समाधान जानकर , प्रशांत घोडके, किरण खुरंगे , बापुराव मारकड, किशोर पाटील, अभिजीत झांबरे , गणेश शेंडगे तसेच चाकाटी , पिठेवाडी , चाकोरे परिसरातील तरुण शेतकऱ्यांनी दिनांक 10 एप्रिल रोजी दिली असल्याची माहिती किरण पाटील यांनी दिली. तसेच माहिती देताना किरण पाटील म्हणाले की पिठेवाडी येथे सुरू असलेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती दर्जेदार व्हावी . जेणेकरून पुढील काळात I बंधाऱ्यातून पाण्याची गळती न होता पाणी जास्त काळ टिकून राहून व या पाण्याचा उपयोग या परिसरातील शेतीसाठी होईल.

## राष्ट्रीय समाज पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी किरण गोफणे



इंदापूर (स. गांवकरी) : राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश कार्यकारणी नुकतेच जाहीर झाली असून त्यामध्ये इंदापूर येथील किरण गोफणे यांची प्रदेश सरचिटणीस या पदावरती निवड झाली आहे असे पत्र पक्षाचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते यांनी जाहीर केले आहे .या निवडीच्या निमित्ताने एका निष्ठावान कार्यकर्त्याला पक्षाने चांगली संधी दिली. यामुळे राष्ट्रीय समाज पक्षाचे कार्यकर्ते आनंदित झाले आहेत. किरण गोफणे यांनी 2005 पासून राष्ट्रीय समाज पक्षामध्ये इंदापूर शहराध्यक्ष इंदापूर तालुका अध्यक्ष माढा व करमाळा विधानसभेचे निरीक्षक पुणे जिल्हा उपाध्यक्ष पुणे जिल्हा अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष आणि आता रासपाच्या प्रदेश सरचिटणीस पदी त्यांची निवड झाली आहे गेले 21 वर्ष पक्षाध्यक्ष महादेव जानकर यांच्या विचाराचा पाईक असणाऱ्या किरण गोफणे यांनी इंदापूर तालुका तसेच जिथे जिथे जबाबदारी मिळेल तिथे प्रामाणिकपणे काम पार पाडलेले आहे.पक्षात निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय दिला जातो असे या निवडीद्वारे सिद्ध झाल्याचे मत पुणे जिल्हा अध्यक्ष तथा पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तानाजी शिंगाडे यांनी व्यक्त केले आहे.



## अर्धापूरात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती ठिक ठिकाणी साजरी

अर्धापूर (स. गांवकरी) : शहरात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती प्रज्ञा बौद्ध विहार,संत सावता महाराज मंदिर, नगरपंचायत कार्यालय यासह अनेक ठिकाणी दि.११ शनिवारी रोजी साजरी करण्यात आली आहे. थोर समाजसुधारक,क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले' यांना जयंतीदिनी प्रज्ञा बौद्ध विहार येथे नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,कॉंग्रसे तालुकाध्यक्ष सुनिल वानखेडे, माजी उपनगराध्यक्ष राजू शेट्टे, भाजप शहराध्यक्ष योगेश हाळदे,माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर,अध्यक्ष गुणवंत विरकर, व्यंकटी राऊत, नामदेव सरोदे,मुस्वीर खतीब, माजी उपसरपंच भुजंगराव माटे, ॲड भानुदास मगरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुतळ्याचे पूजन करून हार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी भिमराव सरोदे, बालाजीराव सिनगारे,गुरूराज रणखांब,ज्ञानेश्वर माटे,बाळू माटे,शेख मकसुद,महिंद्र सरोदे,शेरू पठाण, गोपाल पंडित, प्रसिद्धी प्रमुख गुणवंत सरोदे, ॲड.गौरव सरोदे,बापुजी राऊत, विष्णू राऊत, प्रकाश इंगळे यांच्या सह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. संत सावता महाराज मंदिर, भाजप कार्यालय, नगरपंचायत कार्यालय यासह ठिक ठिकाणी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली आहे.

## जिल्हा बँकेच्या निवडणूकीसाठी कोल्हे यांना मतदानाचा अधिकार

अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील देळुब बु. सेवा सहकारी सोसायटीच्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी गंगाराम कोल्हे यांच्या नावाचा सर्वानुमते बिनविरोध ठराव दि.११ शनिवारी रोजी देळुब बु. मंजूर करण्यात आला आहे. देळुब बु. सेवा सहकारी सोसायटीच्या सर्व संचालक मंडळांची विशेष बैठक चेअरमन मजीतखान पठाण यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आली. त्या विशेष बैठकीत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांकरिता संचालक मंडळाच्या होणाऱ्या निवडणूकीसाठी गंगाराम कोल्हे यांच्या नावाचा ठराव बिनविरोध मंजूर करण्यात आला. या बैठकीला देळुब बु. सेवा सहकारी सोसायटीचे सचिव सखाराम पवार, संचालक नुरखान पठाण, केरबाजी ठोंबरे, श्रीमती कौशल्याबाई ढगे, श्रीमती यशोदाबाई गरड, रामचंद्र बाचेवार, महारुद्र पारटकर, रंजीत दळवे, शंकरराव ढगे, शिवाजीराव ठोंबरे, दगडोजी गरड, रामराव कोल्हे, आयुब शेख, दत्ता कोल्हे, आमेर शेख, अनिल ठोंबरे, सतीश लोमटे, ग्रामस्थ उपस्थित होते.

## रेल्वे स्थानकावरील पार्किंग बंद

मुदखेड (स. गांवकरी) : दक्षिण मध्य रेल्वेच्या महत्त्वाच्या जंक्शनपैकी एक असलेल्या मुदखेड रेल्वे स्थानकावर गेल्या महिनाभरापासून वाहन पार्किंग सेवा पूर्णपणे बंद असल्याने प्रवाशांचे अक्षरशः हाल होत आहेत. दररोज शेकडो प्रवासी या स्थानकावरून प्रवास करत असताना दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी सुरक्षित पार्किंगची सोय नसल्यामुळे मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पार्किंगसाठी नवीन टेंडर प्रक्रिया अद्याप प्रलंबित असल्यामुळे ही सेवा ठप्प पडली आहे. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या दिरंगाईचा फटका थेट सामान्य नागरिकांना बसत आहे.

# भिवंडीतील वंचित वस्तीत मूलभूत सुविधांचा अभाव

## 'नवजीवन' संस्थेच्या माध्यमातून ६०० विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी दिशा!









**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

(स. गांवकरी)

देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक दशके उलटली असली, तरी शिक्षण, पिण्याचे पाणी, निवारा व ओळखपत्रांसारख्या मूलभूत सुविधांपासून आजही काही समाज वंचित असल्याचे वास्तव भिवंडी विधानसभा मतदारसंघात समोर आले आहे. येथे गेल्या वीस वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या कुटुंबांकडे आजही आधार कार्ड, रेशन कार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे नाहीत. पिण्याच्या पाण्याची, शौचालयांची व सुरक्षित निवाऱ्याची सोय नसल्याने नागरिक अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत.

या भागातील बहुतांश नागरिक रोजगारासाठी दररोज बाहेर पडतात. फुगे व इतर लहानसहान वस्तू विकून ते उदरनिर्वाह करतात. दिवसभर पालक बाहेर असल्याने मुलांकडे दुर्लक्ष होते, अन्नाची व शिक्षणाची मोठी समस्या निर्माण होते. परिणामी अनेक मुले शिक्षणापासून दूर राहण्याच्या मार्गावर होती.

अशा परिस्थितीत 'नवजीवन लोकविकास संस्था' या स्वयंसेवी संस्थेने पुढाकार घेत या वस्तीत शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला आहे. संस्थेचे संस्थापक किशोर पाटील यांनी सन 2005 पासून स्वतःचा संसार बाजूला ठेवून या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्य सुरू केले. त्यांच्या अथक प्रयत्नातून आज या ठिकाणी डिजिटल लर्निंग सेंटर, सायन्स प्रयोगशाळा, अध्ययन केंद्र, कॉम्प्युटर प्रशिक्षण व ई-लर्निंग सेंटर यांसारख्या सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

सध्या या संस्थेमध्ये सुमारे 500 ते 600 विद्यार्थी शिक्षण घेत असून शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळत नसतानाही संस्था स्वतःच्या बळावर शिक्षकांना वेतन देत कार्य चालवते. या कार्याला सेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांची मोठी साथ लाभली आहे. गेल्या 15 वर्षांपासून ते विद्यार्थ्यांच्या अन्न व इतर शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी मदत करत आहेत. अलीकडेच मुलींसाठी स्वतंत्र ई-लर्निंग सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याचा शुभारंभ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमावेळी अनेक पालक सकाळपासून उपस्थित राहून आपल्या समस्या मांडण्यासाठी उत्सुक होते.

समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांनी पालकांशी संवाद साधताना भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करत, "मी तुमचे सर्व दुःख दूर करू शकत नाही, पण तुमच्या मुलांच्या शिक्षणासाठी मी सदैव तयार आहे. तुम्ही फक्त मुलांना शिकण्यासाठी प्रोत्साहित करा, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मी कोणतीही कसर ठेवणार नाही," असे आश्वासन दिले.

दरम्यान, या भागातील नागरिकांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे. मतदान हक्क व ओळखपत्रांच्या अभावामुळे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र आहे. भिवंडीतील ही परिस्थिती शासनाच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करत असून, 'नवजीवन' संस्थेचे कार्य मात्र या अंधारात आशेचा किरण ठरत आहे.

## संचालकपदासाठी बाळासाहेब बारडकर यांचा बिनविरोध ठराव

मुदखेड: (स. गांवकरी)

मुदखेड तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या बारड विविध सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदासाठी मतदान करण्याचा अधिकार (ठराव) विविध सेवा सहकारी सोसायटीचे संचालक राजाराम उर्फ बाळासाहेब शंकरराव देशमुख बारडकर यांना बिनविरोध व एकमताने देण्यात आला. या निवडीबद्दल विविध सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने भाजपचे नांदेड उत्तर महामंत्री राजाराम उर्फ बाळासाहेब देशमुख बारडकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे कार्यालय बारड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सबा ता. मुदखेड जि. नांदेड माजी चेअरमन नरसिंगराव रावसाहेब, गोपाळ देशमुख, माजी उपसरपंच प्रदीप देशमुख, सरपंच प्रतिनिधी शिवाजी बुरडे, चेअरमन किशोर देशमुख, प्रभाकरराव भीमेवार, दिगंबर टिपरसे, सोसायटीचे चेअरमन गणपतराव देशमुख, व्हाइस चेअरमन गोविंद बने उपस्थित होते. त्याचप्रमाणे संचालक माधवराव लोमटे, अनंतराव मुलगे, देवराव देशमुख, आत्माराम येमले, विठ्ठल देशमुख, मारुती कांबळे, बाबूराव लोमटे, प्रकाश देशमुख, गजानन कत्रे, मोहनराव देशमुख, सुधाकर आमदुरकर, संभाजी कन्हाळे, मुक्तार सय्यद, अवधूत सिरगिरे, सेक्रेटरी भातनासे, सचिव प्रल्हाद जोंधळे आदी मान्यवर व कार्यकर्ते देखील उपस्थित होते.

## सहाय्यक विद्युत अभियंता तुकाराम घोडविंदे यांचा सन्मान

टिटवाळा: (स. गांवकरी)



महावितरणच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कल्याण ग्रामीण विभागाचे मांडा ग्रामीण शाखेचे उपविभाग उंभारणी चे सहायक अभियंता तुकाराम गोपाळ घोडविंदे यांचा कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांनी प्रशस्तीपत्र व सन्मान चिह्न देऊन सन्मान केला. सहाय्यक अभियंता तुकाराम घोडविंदे यांनी कल्याण ग्रामीण विभागाअंतर्गत आर्थिक वर्ष 2025/2026 मध्ये मुख्य कार्यालयाने दिलेल्या वीज देयक वसुलीचे उदिष्ट तसेच अखंडीत दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी घेतलेल्या अथक प्रयत्नान बद्दल उत्कृष्ट कामगिरी पुरस्कार सन 2025/2026 सन्मानचिन्हे व प्रशस्ती पत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आलाय. कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांनी भविष्या मध्ये असाच उत्साह, स्पुर्ती व कठोर परिश्रम करून महावितरणचा प्रगतीसाठी योगदान द्याल अशी अपेक्षा व्यक्त करत अभिनंदन व शुभेछा व्यक्त केल्या. मांडा ग्रामीण शाखेअंतर्गत मांडा ग्रामीण विभागाने आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये वीजबिल वसुलीमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सदर कालावधीत सेक्शनचा एकूण डिमांड 7.74 कोटी रुपये असताना प्रत्यक्ष वसुली 8.60 कोटी रुपये करण्यात आली असून, 111.07% इतकी उत्कृष्ट वसुली नोंदविण्यात आली आहे. यामुळे शाखेने निर्धारित उद्दिष्टांपेक्षा अधिक कामगिरी करत आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. विशेष म्हणजे,प्रभावी नियोजन, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि ग्राहकांशी योग्य संवाद यामुळे मांडा ग्रामीण शाखेला थकबाकी कमी करण्यातही मोठे यश मिळाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे 10 लाख रुपयांनी थकबाकी कमी करण्यात आली असून, ही बाब शाखेच्या जबाबदार आणि नियोजनबद्ध कामकाजाचे द्योतक आहे. या यशामध्ये शाखा अभियंता तुकाराम गोपाळ घोडविंदे, सहाय्यक अभियंता व सर्व कर्मचारी यांच्या समन्वयित प्रयत्नांचा मोठा वाटा असून, त्यांच्या मेहनतीमुळेच ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली आहे. उपकार्यकारी अभियंता गणेश पवार यांच्या मार्गदर्शनाने हे यश प्राप्त झालं आहे.

## राज्यस्तरीय कलाभूषण पुरस्कार अजय कुलकर्णी यांना प्रदान

नेवासा: (स. गांवकरी)

नेवासा कर्मभूमी असलेले पुणे येथील सोशल वर्कर अजय अंबादास कुलकर्णी यांना श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेचा राज्यस्तरीय कलाभूषण पुरस्कार शुक्रवारी नेवासा येथे झालेल्या कार्यक्रमात श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे सर यांच्या हस्ते व नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.



नेवासा येथील औदुंबर चौकात असलेल्या हॉटेल प्रणामच्या सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे सर होते होते तर नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले, माजी नायब तहसीलदार चंद्रकांत कांदे, जेष्ठ व्यापारी विजय गांधी, शिवसेना नेते भाऊसाहेब वाघ, बालेंद्र पोतदार, नवोदयचे माजी प्राचार्य अन्सार शेख सर, किशोर गारुळे, प्रा.सुनील गर्जे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष शांतवन खंडागळे यांनी आलेल्या अतिथींचे स्वागत करून प्रास्ताविक केले.संस्थेने राबविलेल्या वार्षिक उपक्रमाची माहिती त्यांनी दिली.

यावेळी बोलतांना नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी अजय कुलकर्णी यांनी समाजात देत असलेल्या योगदानाचे कौतुक केले उपेक्षित कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देणारे अजय कुलकर्णी यांनी सांस्कृतिक चळवळ निर्माण केली असल्याचे सांगत त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे सर म्हणाले की अजय कुलकर्णी यांचे वडील अंबादास कुलकर्णी यांनी नेवासा येथे तहसीलदार असतांना तालुक्याच्या हितासाठी कामे केली.अजय कुलकर्णी यांनी देखील कॉलेज जीवनात अनेक तालुक्यातील कलाकारांना प्रोत्साहित केले आज त्यांना मिळालेला कलाभूषण पुरस्कार ही कौतुकास्पद गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिक्षण घेत असतांना प्राचार्य आगळे सरांनी भरपूर पाठबळ देऊन मार्गदर्शन केले त्यांनी दिलेली संस्काराची शिदोरी आज जीवनात कामी येत असल्याचे सांगत त्यांनी गुरूंच्या हस्ते माझ्या सारख्या शिष्याचा कलाभूषण पुरस्कार देऊन सन्मान होतो हीच माझ्या जीवनातील अविस्मरणीय भेट असल्याचे उदगार अजय कुलकर्णी यांनी यावेळी बोलतांना काढले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी सेवानिवृत्त नायब तहसीलदार भानुदास मोहरे, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ, खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष संतोष फिरोदिया, मुद्रांक शुल्क विभागाचे अधिकारी नितीन पाठक, प्रा.राजेंद्र आडसुरे, रमेश अवचरे, अंबादास लष्करे, अँड.प्रदीप वाखुरे, रमेश कणगरे, राजेंद्र परदेशी, अभय मोहिते, महेश मापारी, सुधीर बोरकर, संजय काकडे, संजय वाकचौरे, उद्योजक बाळू मुथ्था, बाळासाहेब कोकणे, वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर, सुनील धायजे, शिवा जंगले, दीपक, बाळासाहेब पंडित साळवे, नाथा शिंदे, विजय कावरे, राजू शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## अंगणवाडी पासूनच दर्जेदार शिक्षण मिळावे : आ. श्रीजया चव्हाण

मुदखेड: (स. गांवकरी)

सर्वच क्षेत्रात करियर घडवण्यासाठी स्पर्धा वाढली आहे. शिक्षणातूनच आपला सर्वांगीण विकास शक्य आहे. यासाठी भोकर मतदारसंघात अंगणवाडी पासून उच्च शिक्षण दर्जे दार मिळावे यासाठी प्रयत्न करणार अशी ग्वाही आ.श्रीजया चव्हाण यांनी दिली आहे. मुदखेड शहरासह या भागातील विविध ठिकाणी गुरुवारी अंगणवाडी इमारतीचे भूमिपुजन आ.श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते झाले त्यावेळी त्या बोलत होत्या यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्षा सौ. विश्रांती कदम, उपनगराध्यक्ष इमरान सेठ मच्छीवाले, तालुका अध्यक्ष दत्तू देशमुख, शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, माधव कदम, रामेश्वर आबादार, उत्तम चव्हाण, संजय आऊलवार, सलाम, उपेंद्र देवदे, संजय सोनटक्के, प्रकाश बल्फेवाड, संदीप मोडवान, चेअरमन गणपतराव कदम, डॉ सुरेश मेगदे, विनोद चंद्रे , सचिन चंद्रे, प्रभाकर पांचाळ, रामराव कदम, बालाजी चुडेवाड, शिवा तोटेवाड, शिवा तरोडेकर, शहरासह तालुक्यात माजी मुख्यमंत्री, खा. अशोकराव चव्हाण यांच्या माध्यमांतून विकासाची अनेक कामे मार्गी लागली आहेत. काही कामे सुरु आहेत काही कामे ऋषिकेश पारवेकर किशोर पारवेकर, चांदू बोकेफोड, माधू चमकुरे आदींची उपस्थिती होती. याच दौऱ्यात आ. श्रीजया विकासाच्या माध्यमातून शहरासह तालुक्याचा कायापालट करणार आपणाला करायची आहेत. शहर, तालुक्याचा विकासाच्या माध्यमातून कायापालट करायचाच आहे. मात्र माझे प्राधान्य स्वछता , आरोग्य व शिक्षणयावर आहे. आगामी काळात जो शिकेल तोच चव्हाण यांनी मुदखेड नगर परिषद सभागृहात शहरातील पाणी पुरवठा विद्युत पथदिवे, स्वच्छता तसेच शहरातील विकास कामांचा आढावा स्पर्धेत टिकेल असे आहे.

# भीमा नदी पात्रामध्ये उन्हाळ्यात पाणीसाठा असणे आवश्यक - हर्षवर्धन पाटील

## उजनी धरण पायथ्याच्या गावांमधील शेती व नळ योजना अडचणीत

इंदापूर: (स. गांवकरी)

इंदापूर व माढा तालुक्यातील उजनी धरण पायथ्याशी असलेल्या भीमा नदी काठच्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या सहकारी तत्त्वावरती तसेच वैयक्तिक उपसा जलसिंचन योजना गेली 30-35 वर्षांपासून सुरू आहेत. मात्र अलीकडच्या दहा-बारा वर्षांपासून उन्हाळ्यामध्ये नदीपात्र कोरडे पडत असल्याने नदीकाठची शेती व नळ पाणी पुरवठा योजना धोक्यात आल्या आहेत, त्यामुळे भीमा नदी पात्रामध्ये उन्हाळ्यात मार्च, एप्रिल, मे महिन्यात पाणीसाठा असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी शुक्रवारी इंदापूर येथे केले.



हर्षवर्धन पाटील यांची श्री भैरवनाथ सुरवड-भांडगाव सहकारी पाणी पुरवठा संस्था, अवसरी सहकारी पाणी पुरवठा संस्था, श्रीनाथ सहकारी पाणी पुरवठा संस्था, या सहकारी तत्त्वावरील पाणी पुरवठा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच भीमा नदीकाठच्या इंदापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी भीमा नदीपात्रामध्ये उन्हाळ्यात पाणीसाठा असणे संदर्भात भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली. दरम्यान, यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी सु. स. खांडेकर अधिक्षक अभियंता उजनी धरण सोलापुर यांचेशी दूरध्वनी वरून चर्चा करून शेतकऱ्यांच्या या मागणी संदर्भात शासन दरबारी तसेच कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत प्रस्ताव मांडण्याची सूचना केली. हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, भीमा नदी पात्रातील नैसर्गिक पाणी प्रवाहावरती जलसंपदा विभागाने इंदापूर तालुक्यात सहकारी तत्वावर व हजारो शेतक-यांना वैयक्तिक पाणी परवाने दिलेले आहेत. या सहकारी संस्थांनी व शेतकऱ्यांनी वैयक्तिक कर्ज घेऊन कष्टाने पाईप लाईन केल्या आहेत. मात्र अलीकडच्या दशकात उन्हाळ्यात तीन-चार महिने भीमा नदी पात्र कोरडे पडत असल्याने उजनी धरण्याच्या पायथ्याशी असलेल्या गावांमधील शेती पिके व गावच्या पिण्याच्या नळ पाणीपुरवठा योजना अडचणी येत आहेत. त्यामुळे उजनी धरणाच्या पायथ्याखालील गावांमधील शेतकऱ्यांना व नागरिकांना पूर्वीच्या नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार आताही उन्हाळ्यातील मार्च, एप्रिल, मे व जून या महिन्यामध्ये नदीपात्रामध्ये पाणी असणे हे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आवश्यक आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने उन्हाळ्यामध्ये शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सुमारे 150 ते 200 क्युसेसने भीमा नदी पात्रात उजनीतून पाणी प्रवाह चालु ठेवावा, त्यामुळे भीमा नदी पात्रात पाणीसाठा उपलब्ध होईल, असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

### शेतकरी करतात प्रतिवर्षी रू. 50 लाख खर्च!

श्री भैरवनाथ सुरवड-भांडगाव सहकारी पाणी पुरवठा या संस्थेतील शेतकऱ्यांनी शेती तारण ठेऊन जिल्हा बँकेकडुन 1.25 कोटी कर्ज घेतले व या संस्था उभी केली. संस्थेचा देखभाल खर्च, कामगार पगार, विज बील,जलसंपदा विभागाची पाणीपट्टी असा वार्षिक रू. 50 लाख खर्च सध्या शेतकरी करीत आहेत. यासाठी आम्हांला शासनाची कोणतीही मदत मिळत नाही. आमच्या एका उपसा सिंचन संस्थेमुळे 1 हजार एकर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. तसेच जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या चा-याचा प्रश्नही मिटला आहे. प्रारंभी संस्था सुरू झालेवर भीमा नदीपात्रात 12 महिने पाणी होते परंतु गेली 10 वर्षे नदी पात्र मार्च पासून कोरडे पडत आहे, अशी माहिती यावेळी संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय घोगरे, निरा भिमा कारखान्याचे उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे आदींनी दिली.

# “महिलांना राजकारणात नवे बळ” – आमदार देवयानी फरांदे

नाशिक : (स. गांवकरी)




देशव्यापी नारी शक्ती वंदन अभियान अंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणासाठी ऐतिहासिक ठरलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियम विषयी नाशिक येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. भारतीय जनता पार्टी कार्यालयात आयोजित या पत्रकार परिषदेत आमदार देवयानी फरांदे यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी शहराध्यक्ष सुनील केदार व गोविंद बोरसे उपस्थित होते.

आमदार फरांदे यांनी सांगितले की, सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेमध्ये मंजूर झालेला हा कायदा लोकसभा, राज्य विधानसभा व दिल्ली विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देणारा ऐतिहासिक निर्णय आहे. या निर्णयामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढणार असून देशाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. त्यापुढे म्हणाल्या की, केंद्र सरकारच्या विविध योजनांमुळे महिलांच्या जीवनमानात मोठा बदल झाला आहे. उज्ज्वला योजना, जल जीवन मिशन, स्वच्छ भारत अभियान, जनधन योजना, मुद्रा योजना आणि स्टँड-अप इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे महिलांना आर्थिक व सामाजिक बळ मिळाले आहे. शिक्षण, आरोग्य व पोषण क्षेत्रातही महिलांची स्थिती सुधारली असून मातामृत्यू दरात घट झाली आहे. राजकारणातील महिलांच्या सहभागाबाबत बोलताना त्यांनी नमूद केले की, पंचायतराज संस्थांमध्ये सुमारे ४६ टक्के महिला प्रतिनिधित्व आहे. तसेच देशातील निवडणुकांमध्ये महिलांचा मतदानाचा टक्का सातत्याने वाढत आहे. मात्र संसद आणि विधानसभांमध्ये महिलांचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याने हा कायदा अत्यंत आवश्यक होता. महिलांना निर्णयप्रक्रियेत स्थान मिळाल्यास शासन अधिक लोकाभिमुख आणि प्रभावी होते, असे सांगत त्यांनी शिक्षण, आरोग्य, पाणी व स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर अधिक लक्ष केंद्रित होईल, असा विश्वास व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले जात असून, नारी शक्ती वंदन अधिनियम हा २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. या पत्रकार परिषदेत उपस्थितांनी या कायद्याबाबत जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.



## खारघर येथे रस्त्यावर डांबर सांडल्याने वाहतूक विस्कळीत; पोलिसांची तत्पर कारवाई, मोठा अपघात टळला!

नवी मुंबई : खारघर येथे रस्त्यावर डांबर तयार करण्यासाठी वापरला जाणारा चिकट पदार्थ मोठ्या प्रमाणात सांडल्याने वाहने घसरू लागली आणि काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जोशी हेही आपल्या पथकासह मदतीसाठी दाखल झाले. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलिसांनी तात्पुरता वाहतुकीचा मार्ग बदलला. पर्यायी मार्गांवर वाहनांची योग्य वळवणूक करण्यात आली तसेच प्रमुख चौकांवर पोलीस कर्मचारी तैनात करून वाहतूक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...



### भाजपा आमदारासह पदाधिकारांचे पोलीस आयुक्तांना निवेदन

नाशिक (स. गांवकरी) : शहरामध्ये समोर आलेल्या टी सी एस कॉर्पोरेट लव्ह जिहाद व धर्मांतरण प्रकरण भोंदू बाबा अशोक खरात, तथाकथित रविंद्र एरंडे अशा गंभीर प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर शहरातील तिन्ही आमदारांनी पोलिस आयुक्तांची भेट घेत निवेदन दिले.महिला सुरक्षेच्या दृष्टीने या प्रकरणांना अधिक गांभीर्याने घेऊन दोषींवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. नाशिकमध्ये महिलांसाठी स्वतंत्र हेल्पलाइन सुरू करावी तसेच “झिरो टॉलरन्स” मोहीम राबवून महिलांमध्ये जनजागृती करण्यात यावी, अशी मागणी केली. तसेच, अन्याय होत असल्यास महिला व तरुणींनी कुठलीही भीती न बाळगता थेट पोलिसांकडे किंवा लोकप्रतिनिधींकडे तक्रार दाखल करावी, असे आवाहनही मी यावेळी केले. देवाभाऊंचे सरकार महिला सुरक्षेबाबत पूर्णपणे कटिबद्ध आहे, असेही मी नमूद केले. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. आदरणीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पोलिस प्रशासन प्रभावीपणे कार्य करत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे, याचा आम्हाला विश्वास आहे. यावेळी आमदार सौ. सीमाताई हिरे, आमदार राहुल भाऊ ढिकले, भाजपा शहराध्यक्ष श्री. सुनील नाना केदार, मनपा गटनेते ॲड. श्री शाम बडोदे, भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस श्री सुनील देसाई, सौ. रश्मी हिरे ,नगरसेविका सौ स्वाती भामरे , सौ संध्या कुलकर्णी यांच्यासह भाजपा पदाधिकारी, व कार्यकर्ते उपस्थित होते.



### स्वकुळ साळी ज्ञातिगृहाची नवीन कार्यकारिणी बिनविरोध जाहीर

आळंदी (स. गांवकरी) : श्रीक्षेत्र आळंदी येथील स्वकुळ साळी ज्ञातिगृहाच्या विश्वस्त मंडळाची निवड बिनविरोध पार पडली असून याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी अनिल बन्सीलाल शहारे यांनी केली. निवडणूक निर्णय अधिकारी शहारे यांच्या हस्ते नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी अमित सूर्यकांत उगले, उपाध्यक्षपदी मनोहर किसनराव दिवाणे, सचिवपदी देवेन पुष्पलाल क्षीरसागर, सहसचिवपदी दीपक बाबुराव मारवाडी, खजिनदारपदी प्रवीण प्रभाकर जुंदरे, अंतर्गत हिशोब तपासणीसाठी नंदकिशोर जानकीराम ढोकळे यांची निवड करण्यात आली. तसेच विश्वस्त म्हणून दिलीप विश्वनाथ जाळिंद्रे, मंगल हरीश अष्टेकर, ॲड. स्वाती सुरेश लंगोटे, अविनाश पंढरीनाथ साळी, अनिल दशरथ भागवत, मुकुंद तुकाराम साळी, विलास बाबुराव सरोदे, महादेव बबनराव साळी, सुनील अविनाश पावले आदींची निवड झाली. सल्लागार पदावरही सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यंदा स्वकुळ साळी ज्ञातिगृहाचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम व योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती नूतन अध्यक्ष अमित उगले यांनी दिली. उपाध्यक्ष मनोहर दिवाणे यांनीही समाज बांधवांना एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन करत मार्गदर्शन केले. निवड झालेल्या कार्यकारिणीचे थोर समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे तसेच नवनाथ जाधव यांनी अभिनंदन केले.

### कौशल्याला मिळणार शैक्षणिक मान्यता

संगमनेर (स. गांवकरी) : कौशल्याधारित काम करणाऱ्या नागरिकांना त्यांच्या अनुभवाच्या आधारे अधिकृत शैक्षणिक प्रमाणपत्र मिळावे, यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्व शिक्षण मान्यता मूल्यांकन केंद्राच्या माध्यमातून प्राथमिक बैठक सह्याद्री महाविद्यालय, संगमनेर येथे आयोजित करण्यात आली. या उपक्रमामुळे अनेकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असल्याचा विश्वास माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केला. या बैठकीचे आयोजन जयहिंद लोकचळवळचे समन्वयक उबेदभाई शेख, सुनिता कांदळर, अंजुम बागवान यांनी केले. यावेळी जयहिंद लोकचळवळचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे, पूर्व शिक्षण मान्यता केंद्राचे संचालक डॉ. राम ठाकर, विद्यार्थी सेवा विभागाचे डॉ. प्रकाश देशमुख, जयहिंद महिला मंच अध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्रशासकीय संयोजक अतिक शेख, नगरसेवक डॉ. दानीश शेख, ज्ञानेश्वर नाईक, फैजान तांबोळी, मोहसीन शेख, आवेज खान उपस्थित होते. आर्थिक अडचणींमुळे अनेक तरुण-तरुणींना औपचारिक शिक्षण घेता येत नसले तरी ते इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, मेकॅनिक, वायरमन, विणकाम, शिवणकाम, टेलरिंग अशा विविध क्षेत्रांत प्रवीणतेने काम करत असतात. मात्र, शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या अभावामुळे त्यांना नोकरीच्या चांगल्या संधींपासून वंचित राहावे लागते. या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अशा कुशल नागरिकांना त्यांच्या कौशल्याचे अधिकृत प्रमाणपत्र मिळणार असून, त्यातून त्यांना रोजगार, प्रगती आणि सामाजिक सन्मान मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## शक्तिप्रदर्शन : उमेदवारांनी उत्साहात उमेदवारी अर्ज भरले

डांग. गुजरात : (स. गांवकरी)

■ सुबीर मतदारसंघात सासू-सुनांमध्ये थेट लढत



डांग जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अंतिम दिवशी भाजपाकडून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. जिल्ह्यातील एकूण १८ जिल्हा परिषद जागा तसेच तीनही तालुक्यांतील ४८ पंचायत समिती जागांसाठी प्रदेश भाजपाने शुक्रवारी उशिरा रात्री उमेदवारांची यादी जाहीर केली होती. त्यानंतर शनिवारी सर्व उमेदवारांनी विधिवत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

आहवा, वघई आणि सुबीर तालुक्यांत भाजपाच्या उमेदवारांसोबत मोठ्या संख्येने कार्यकर्ते उत्साहात सहभागी झाले होते. डांगचे आमदार विजयभाई पटेल, संघटन प्रभारी राजेशभाई देसाई आणि जिल्हा भाजपाध्यक्ष किशोरभाई गावीत यांच्या नेतृत्वाखाली पक्ष कार्यालयापासून रॅली काढून शक्तिप्रदर्शन करण्यात आले. उमेदवारांनी निवडणूक अधिकाऱ्यांसमोर अर्ज सादर केले आणि सर्वांना अधिकृत मंडेटही देण्यात आले. या निवडणुकीत बहुमताने विजय मिळवण्याचा निर्धार भाजपाने व्यक्त केला आहे.

सुबीर जिल्हा परिषद जागेवर सासू-सुनांमध्ये अनोखी लढत सुबीर जिल्हा परिषद मतदारसंघात रोचक राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. काँग्रेसकडून ज्यनूबेन बाबुभाई बागुले यांनी उमेदवारी दाखल केली असून भाजपाकडून त्यांची सून प्रियांकाबेन राजुभाई कुवर यांनी अर्ज भरला आहे. त्यामुळे सासू-सुनांमध्ये थेट लढत होत असून ही निवडणूक जिल्हाभर चर्चेचा विषय ठरली आहे.

श्यामगहान जागेवर अपक्ष उमेदवारीमुळे रंगत वाढली आहवा तालुक्यातील श्यामगहान जिल्हा परिषद जागेसाठी भाजपाकडून उमेदवारी न मिळाल्याने कमळीबेन अर्जुनभाई गवळी यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या जागेवरील लढत अधिक चुरशीची होण्याची शक्यता आहे.

शनिवारी अंतिम दिवशी सुबीर आणि आहवा तालुक्यांत काँग्रेसच्या उमेदवारांनीही अर्ज दाखल केले. डांग काँग्रेस अध्यक्ष स्नेहल ठाकरे आणि माजी आमदार मंगलभाई गावीत यांच्या नेतृत्वाखाली सर्व जागांसाठी उमेदवार उत्साहाने मैदानात उतरले.

डांग जिल्ह्यात भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी उमेदवारी प्रक्रिया पूर्ण केल्याने आता येणाऱ्या दिवसांत निवडणूक चुरशीची होणार आहे. महत्त्वाच्या जागांवर कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## महात्मा फुले जयंती महाविद्यालयात उत्साहात साजरी

निमगाव सावा: (स. गांवकरी)

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. संदिपान पवार यांच्या शुभहस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष मा. संदिपान पवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित घटकांना उभारी दिली. त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचून समाज परिवर्तनाची क्रांती घडवून आणली. त्यांच्या विचारांचा आदर्श घेत समाजात समता, बंधुता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची आज अधिक गरज आहे. कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी पुढे नमूद केले की, “शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन असून विद्यार्थ्यांनी ज्ञान, समता आणि मानवतेच्या मूल्यांना जोपासावे. महात्मा फुले यांचे विचार हे समाजाला दिशा देणारे दीपस्तंभ आहेत.” या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद शिंदे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी




बेल्हे : (स. गांवकरी)

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून सकारात्मक विचारसरणी आणि शैक्षणिक विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे उद्गार संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी काढले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले अर्पण करण्यात आली. महात्मा फुले बद्दल माहिती देताना प्रा. राजीव सावंत म्हणाले की,महात्मा फुले हे मराठी लेखक,विचारवंत आणि समाजसुधारक होते.त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली.शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जनतेने त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली होती.'शेतकऱ्यांचे आसूड' हा ग्रंथ महात्मा फुले यांनी लिहिला होता.तसेच मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत इ.स.१८५२ मध्ये शाळा स्थापन केली.स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.जोतिबा फुले यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकांनी त्याना मुंबईतील सेभेत १८८८ मध्ये‘महात्मा’ही उपाधी दिली.त्यामुळे ज्योतिबा फुले हे महात्मा फुले या नावाने ओळखले जाऊ लागले.त्यांनी अनेक पुस्तके लिहिली.अशा या थोर समाजसेवकांच्या प्रति आपण सर्वजण कृतज्ञ राहून त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊयात आणि आपले इप्सित शैक्षणिक कार्य अखंडितपणे समाजामध्ये निर्विवाद पोहचवूया असे आवाहन डॉ. उत्तम शेलार यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश बोरचटे यांनी तर आभार प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी मानले.

# समतेचा दीप प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प

## निघोजमध्ये महात्मा फुले जयंती उत्साहात

पारनेर : (स. गांवकरी)



शनिवार दि. ११ एप्रिल २०२६ महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त निघोज येथे आयोजित कार्यक्रम उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी त्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, “महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी शिक्षणाचे द्वार खुले केले.

त्यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश देत परिवर्तनाची क्रांती घडवून आणली. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि समाजात समानतेची भावना रुजवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.”

ते पुढे म्हणाले, “आजच्या आधुनिक युगातही महात्मा फुले यांचे विचार अत्यंत प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहावे, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.”

तसेच उपस्थित युवकांना उद्देशून त्यांनी सांगितले की, “महात्मा फुले यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि सामाजिक ऐक्य वाढवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.” या कार्यक्रमास मळगंगा देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, रमेशशेठ वरखडे, रोहिदासशेठ लामखडे, डीवायएसपी सुभाषजी सोनवणे, पीएसआय दिलीपजी सोनवणे, समता परिषदेचे अध्यक्ष पृथ्वीदादा कोल्हे, सोसायटीचे व्हाईस चेअरमन हिराभाऊ सोनवणे, मातंग समाज चळवळीचे सतीशजी साळवे, सुलतानभाई सय्यद, प्रवीण व्यवहारे, राहुल वाघमारे, राजुशेठ कुदळे, विनायक सोनवणे, शांताराम सोनवणे, दामूशेठ लंके, निलेश रसाळ, अनिल मदगे, अजय सोनवणे आदी मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून, त्यांच्या विचारांवर चालत समाजप्रगतीचा संकल्प अधिक दृढ करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# एन. के. टी. कॉलेजमध्ये पदवी ग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

ठाणे : (स. गांवकरी)




ठाणे जिल्ह्यातील एन.के. टी. कॉलेज येथे पदवी ग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शिक्षण पूर्ण करून पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या सोहळ्यात थोर समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून येत होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात विद्यार्थ्यांनी मिळवलेली पदवी ही केवळ शैक्षणिक टप्पा नसून

### विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण!

आयुष्यातील नव्या जबाबदाऱ्यांची सुरुवात असल्याचे सांगितले. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करावा, प्रामाणिकपणे कार्य करत आपल्या कर्तृत्वाने संस्थेचे व पालकांचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच सामाजिक बांधिलकी जपत समाजसेवेच्या कार्यात सहभागी व्हावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. महाविद्यालयाच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमास प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात पदवी ग्रहण सोहळा संपन्न झाला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)